आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०२ नोव्हेंबर २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. संशोधन आणि विकास परिसंस्थेला चालना देण्यासाठी नवोन्मेष परिषद २०२५ चं उद्या पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन.

2. कार्तिकी एकादशीनिमित्त सुमारे आठ लाख भाविक पंढरपूरात दाखल.

3. नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्यांचं संरक्षण होण्यासाठी रब्बी हंगामातही राज्य सरकारद्वारा 'पंतप्रधान पीक विमा योजना' लागू.

4. अमरावती आणि नाशिक मध्ये प्रत्येकी एक 'सी - ट्रिपल आयटी' केंद्र स्थापन होणार.

5. पाच टी-20 मालिकेच्या तिसऱ्या सामन्यात भारताचा विजय तर आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना भारत आणि साऊथ आफ्रिका दरम्यान सुरू.

<u>नवोन्मेष परिषद-२०२५</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्लीत उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषद २०२५ चं उद्घाटन करतील. या कार्यक्रमात ते देशातल्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला चालना देण्यासाठी १ लाख कोटी रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजना निधीची सुरुवात करतील. शिक्षण तज्ञ, संशोधन संस्था, उद्योग आणि सरकार मधल्या ३ हजारापेक्षा जास्त सहभागींना एकत्र आणणं हे या तीन दिवसीय परिषदेचं उद्दिष्ट आहे. यामध्ये भाषणं, पॅनेल चर्चा, सादरीकरणं आणि तंत्रज्ञान विषयक प्रदर्शनं आयोजित केली जातील. देशाची विज्ञान आणि तंत्रज्ञान परिसंस्था मजबूत करण्यासाठी संशोधक, उद्योग आणि तरुण नवोन्मेषकांमधल्या सहकार्यासाठी हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आलं आहे.

<u>कार्तिक एकादशी</u>

महाराष्ट्रात आज कार्तिकी एकादशीनिमित्त राज्यभरातल्या विठ्ठल मंदिरांमधे गर्दी झाली आहे. ऐकुया याबाबत अधिक माहिती-

*कार्तिकी एकादशी निमित्ताने आज पहाटे पंढरपुर इथं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक विठ्ठलाची शासकीय महापूजा केली. राज्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांवरचं संकट दूर करावं असं साकडं शिंदे यांनी विठुरायाला*

*घातलं. यावेळी मानाचे वारकरी म्हणून नांदेड जिल्ह्यातले रामराव आणि सुशिलाबाई वालेगावकर या दांपत्याला विठ्ठलाची महापूजा करण्याचा मान मिळाला. मानाच्या वारकऱ्यांना राज्य परिवहन- एसटीचा मोफत पास आता एक वर्षा ऐवजी कायमस्वरूपी देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केली. एकादशीमुळे पंढरपूरात पहाटेच लाखो भाविकांनी चंद्रभागा नदीत पवित्र स्नान केलं. महाराष्ट्रासह, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि इतर राज्यांतून सुमारे आठ लाख भाविक पंढरपूरात दाखल झाले असून 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषानं परिसर दुमदुमला.*

<u>पंतप्रधान पीक विमा योजना</u>

राज्य सरकारने नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्यांचं संरक्षण होण्यासाठी रब्बी हंगामातही 'पंतप्रधान पीक विमा योजना' लागू केली आहे. खरीप २०२५ आणि रब्बी २०२५-२६ हंगामासाठी गहू, रब्बी ज्वारी, हरभरा, उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग आणि रब्बी कांदा या सहा पिकांचा विमा घेता येणार आहे.या योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होता येईल. निश्चित मुदतीत विमा भरल्यास नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळणार आहे, अशी माहिती कृषी विभागाचे मुख्य सांख्यिकी वैभव तांबे यांनी दिली. योजनेत सहभाग घेण्याची अंतिम मुदत रब्बी ज्वारीसाठी ३० नोव्हेंबर, गहू, हरभरा, रब्बी कांदा या पिकांसाठी १५ डिसेंबर आणि उन्हाळी भात, तसंच उन्हाळी भुईमूग या पिकांकरिता ३१ मार्चपर्यंत आहे. त्यासाठी विमा योजनेचे पोर्टल कार्यान्वित केले आहे. कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होण्यासाठी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेमार्फत योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज देणे आवश्यक असल्याचं तांबे यांनी सांगितलं.

<u>पालकमंत्री इंद्रनील नाईक</u>

गोंदिया जिल्ह्यात दोन दिवसाआधी आलेल्या अवकाळी पावसामुळे कापणीला आलेल्या धान पिकाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असून पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी आज गोंदिया जिल्ह्यात शेतावर जाऊन धान पिकांची पाहणी करित कृषी विभागाला नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. लवकरात लवकर नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळवून देण्याचं आश्वास देखील त्यांनी दिलं -

*आवर्जुन दोन ते तीन तालुके झाले आहेत पण आम्ही प्रयत्न करतोय की 5- 6 तालुके येथे आजच्या आज कवर करू आणि एक मात्र निश्चित आहे की काही तालुक्याचा नुकसाना*

*भरपूर प्रमाणात प्रत्येक जागेवर दिसतोय आपल्याला आता नुकसान कमी जास्त किंवा काय समस्या आहेत ते कास्तकारांना भेटून ते ही ऐकून घेतलं मी आणि शासन स्तरावर वरतून कसं सोडवण्यात येतील त्याचा आम्ही तिथे पाठपुरावा करू. पंचनामे बघा यांचे काही ठिकाणी मला मी जे रिपोर्ट घेतो त्याच्या 40 टक्के 50 टक्के आणि 60 टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले आहेत या स्पीडनी झाले तर दोन दिवसांत किंवा ३ दिवस्तात पूर्ण होतील.*

गोंदिया जिल्ह्यात या वर्षी 1 लक्ष 75 हजार हेक्टर शेतजमिनीवर धान पिकांची लागवड करण्यात आली असून दिवाळी आधी मोठ्या प्रमाणात हलक्या वानाचे धान पीक कापणीला असताना झालेल्या पावसामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

<u>ऍग्रोव्हिजन</u>

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारत परिसरात येत्या, 21 ते 24 नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या १६ व्या ॲग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शन, कार्यशाळा आणि परिषद स्थळाचं भूमिपूजन राज्यमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते आज पार पडलं. ॲग्रोव्हिजन हे शेतकऱ्यांसाठी नवीन तंत्रज्ञान, आधुनिक शेती पद्धती आणि कृषि संशोधनाची माहिती मिळविण्याचे प्रभावी व्यासपीठ आहे. सर्व शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन नवीन टेक्नॉलॉजीचा लाभ घ्यावा आणि आपल्या शेतीत त्याचा वापर करावा असं आवाहन भोयर यांनी यावेळी केलं.

<u>‘सी-ट्रिपल आयटी’</u>

उद्योग आणि कौशल्य विकास क्षेत्रात महाराष्ट्राला आघाडीवर आणण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून अमरावती आणि नाशिक या दोन जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक ‘सी-ट्रिपल आयटी’ केंद्र शासनानं मंजूर केलं आहे. या अंतर्गत, संशोधन, नवसंकल्पना आणि उद्योजकता वाढीला लावण्याकरता मार्गदर्शन आणि प्रशिक्षण केंद्र सुरु होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून अशा प्रकारची केंद्र सुरु करण्याविषयी सुचवलं होतं, त्याला कंपनीनं मान्यता दिली आहे. या केंद्रांमुळे युवकांना कृत्रिम बुद्धिमत्ता तसंच ‘रोबोटिक्स’, ‘इंटरनेट ऑफ थिंग्स’, ‘डेटा अनालिटिक्स, ‘इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञान’, ‘ऑटोमेशन’ या क्षेत्रांमधल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित जागतिक दर्जाचं प्रशिक्षण मिळणार असून युवकांकरता स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

ओबीसी नेते हेमंत पाटील

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तींमुळे निर्माण होणाऱ्या कर्जाच्या दुष्टचक्रातून कायमस्वरूपी मुक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने उच्चाधिकार समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारचे हे पाऊल कौतुकास्पद आहेच, शिवाय शेतकऱ्यांची कायमस्वरुपी कर्जमुक्तीसह इतर समस्यातून मुक्तता करण्याच्या दिशेने ऐतिहासिक वाटचाल ठरेल, असं प्रतिपादन इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी केलं. मुख्यमंत्र्यांचे प्रधान आर्थिक सल्लागार आणि 'मित्रा' चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली या उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला पुढील सहा महिन्यांच्या आत, कृषी क्षेत्रातील समस्यांवर अल्पकालीन तसेच दीर्घकालीन उपाययोजना सुचवण्याचं महत्वाचं कार्य सोपवण्यात आलं आहे.

क्रिकेट समग्र

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना आज मुंबईत भारत आणि साऊथ आफ्रिका दरम्यान सुरू आहे. हा अंतिम सामना पावसामुळे बराच उशिरा सुरू झाला. साऊथ आफ्रिका संघांन नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या दोन्ही संघानं आजवर विश्व चषकावर नाव कोरलं नाहीय. त्यामुळे दोन्ही संघांसाठी विजय महत्वाचा आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाच्या १६ व्या षटकांत एकही गडी न गमावता ९७ धावा झाल्या होत्या. तर दुसरीकडे ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या भारत आणि ऑस्ट्रेलिया पुरुष क्रिकेट स्पर्धेच्या पाच टी 20 मालिकेच्या तिसऱ्या सामन्यात आज भारताने ऑस्ट्रेलियाचा पाच गडी राखून पराभव केला. ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करत 186 धावांचं लक्ष भारतासमोर ठेवलं होतं. भारताने अठराव्या षटकातच हे लक्ष पाच गडी गमावून पूर्ण केलं. या पाच सामन्यांच्या मालिकेत आता भारत आणि ऑस्ट्रेलियात एक- एक अशी बरोबरी झाली आहे. पहिला सामना पावसामुळे रद्द करण्यात आला होता.

अंमली पदार्थ

गोंदिया पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं डांगुर्ली परिसरात अंमली पदार्थांची वाहतूक आणि विक्री करणाऱ्या विरुद्ध कारवाई केलेली आहे. आरोपीकडून १ किलो ९९० ग्रॅम गांजा आणि इतर साहित्यासह एकूण १ लाख ३४ हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

हवामान

मोसमी पाऊस भारतीय उपखंडातून रवाना झाल्यानंतरही देशाच्या विविध भागात पाऊस होत आहे. अरबी समुद्रात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा आता निवळला असल्याचं हवामान विभागाने सांगितलं आहे . येत्या दोन दिवस संपूर्ण कोकणात काही ठिकाणी तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

****